# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


Mira Bhayandar @2047

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 105 /2023-24 दि. 15 /03/2024

## // कार्यालयीन आदेश //

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभाग, आस्थापना विभाग, आरोग्य विभाग, उद्यान विभाग,पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग तसेच अन्य विभागांमार्फत बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात येतात. माझ्या असे निदर्शनास आले आहे की,मनुष्यबळ पुरवठा करणा-या कंपन्या किंवा निविदाकार यांच्याकडे जे मनुष्यबळ आहे ते कामगार विविध शासकीय विभाग किंवा महानगरपालिकेमध्ये काम करत असतात त्या सर्व कामगारांची कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम (PF), कामगार विमा (ESIC) ची रक्कम तसेच अन्य शासकीय रक्कमा या एकत्रित चलनाद्वारे भरण्यात येतात. त्यामुळे आपल्या महापालिकेमधील काम करणा-या कामगारांचा भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा व कामगार विम्याच्या रक्कमा भरलेल्या आहेत किंवा नाही याबाबत स्पष्टता दिसून येत नाही.

वरील वस्तुस्थिती असल्यामुळे यापुढे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये काम करणा-या कंपन्या किंवा निविदाकार यांनी मिरा भाईंदरमध्ये कामनिहाय काम करणा-या कामगारांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (PF)च्या रक्कमा व कामगार विमा रक्कमा (ESIC) या स्वतंत्र चलानाद्वारे भराव्यात व चलनावरील नमूद कामगार संख्या व संबंधित कामावर काम करणा-या कामगारांची संख्या यामध्ये कोणतीही तफ़ावत राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी त्याच संख्येची उपस्थित कामगारांची यादी सोबत जोडावी.

संबंधित विभागाने भविष्य निर्वाह निधीच्या चलनावरील कामगार संख्या व यादी यासोबत कामावर उपस्थित कामगारांचे हजेरीपट यांचा ताळमेळ घेण्यात यावा. विभागाने चलने तपासताना नियमानुसार भराव्या लागणा-या रकमांचे चलन असल्याची खात्री करावी. तसेच सदरची चलने सत्य असल्याची खात्री करण्यासाठी संबंधित विभागाच्या वेबसाइटवर जाऊन चलनावर असलेला QR CODE SCAN करून पहावा.

तसेच मनुष्यबळ पुरवठा करणा-या सर्व कंपन्या / निविदाकारांनी यापुर्वीच्या आदेशानुसार कामगारांचे वतेन देण्यासाठी स्वतंत्र बॅक खाते उघडण्याबाबत निर्देश देण्यात आले होते त्यानुसार स्वतंत्र खाते उघडल्याबाबत विभागांनी खात्री करावी.

अति.आयुक्त 1 व 2 यांनी याबाबतच्या कार्यवाहीवर सनियंत्रण ठेवावे.

(संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.))
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत-**

1) अति.आयुक्त (1 व 2)
2) सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख
3) शहर अभियंता
4) मुख्य लेखा परिक्षक
5) मुख्य लेखा व वित्त अधिकारी